## रे.क.न. १०३/२०22 मधील निशाणी क्रमांक ५ खालील आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा दावा कायम मनाईसाठी दाखल केला आहे.

०२. वादीचे दावा मिळकती मध्ये प्रतिवादी अगर त्यांचेतर्फे इसमानी हरकत व अडथळा करु नये अगर दावा मिळकतीतून वादींना हुसकावून लावू नये अशी प्रतिवादी विरुध्द दावेचे अंतिम निकालपावेतो तुर्तातुर्त मनाई आदेश पारित व्हावा अशी विनंती उक्त अर्जान्वये केली आहे.

**दावा मिळकतीचे वर्णन** –

०३. मौजे अंबर्डे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर येथील जमीन–

| अ.क्रं. | मिळकत नंबर | क्षेत्र | मिळकतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | १४६ | ७६ X ६५ फुट लांबी रुंदीची एकणू क्षेत्र १५०० चौ.फुट | आर.सी.सी. बाधकाम इमारत. |

वर नमुद मिळकत ही या दाव्याचा वाद विषय होय त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे.

पुर्वेस – बाजीराव बंडू पाटील यांची मिळकत व गल्ली रस्ता

पश्चिमेस – किशोर बोरवणकर यांची मिळकत.

दक्षिणेस – गजानन राजाराम बोरवणकर यांची मिळकत व त्यापिलकडे रस्ता.

उत्तरेस – अशोक व सुरेश बोरवणकर यांची मिळकत.

(यापुढे सदर मिळकतीस 'दावा मिळकत' असे संबोधण्यात येत आहे.)

**<u>अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे</u>** –

**०४.** वर नमुद दावा मिळकत ही किशोर गोपाळ बोरवणकर यांची वडीलोपार्जित मालकी वहिवाटची मौजे अंबर्डे गावचे गावठाण हद्दीतील मिळकत आहे. सदरची मिळकत किशोर गोपाळ बोरवणकर यांचेकडे साधारणपणे १९७३ पासून प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीस असणारी मिळकत होय. सदर मिळकतीचे पश्चिमेस किशारे बोरवणकर यांचे रहाते घराची ग्रामपंचायत मिळकत क्रं. १४१ ची मिळकत असून तिचा वापर देखील किशोर बोरवणकर हे त्याचे दैनंदिन वापराकरीता करीत होते. सदरची मिळकत सन १९७३ पासून १९९२ पर्यंत ग्रुपग्रामपंचायत हरपवडे यांचेकडे कर आकरणी नोंदवहीस नोंद होती. दावा मिळकत गावठाण मध्ये असून तिचा सिटी सर्व्हे झालेला

नाही. अंबर्डे गावची ग्रामपंचायत सन १९९२ साली स्थापन झाली असून सदर स्थापनेपासून दावा मिळकतीच्या नोंदी ग्रामपंचायतीकडे असेसमेंट सदरी नोंद आहेत व त्याचा घरफाळा व कर वादींचे पूर्वी किशोर बोरवणकर हे भरत होते.

**०५.** दावा मिळकतीमधील असणा–या आर.सी.सी. घर मिळकतीचे बांधकाम सध्या अंतिम टप्यात आले असताना प्रतिवादी यांचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध नसताना स्थानिक राजकारणातून प्रतिवादी क्रं.१ यांनी वादींना दावा मिळकतीमधील मंदिराचे बांधकाम करणेस हरकत करु लागले आहेत. दावा मिळकत ही श्री. गजानान महाराज भक्त परिवार ट्रस्ट अंबर्डे तर्फे अध्यक्ष श्री.मकरंद किशोर बोरवणकर यांना श्री. किशोर गोपाळ बोरवणकर आणि सौ. शोभा किशोर बोरवणकर यांनी दि. ०७.०९.२०२१ रोजी दुय्यम निबंधकसो पन्हाळा यांचकडील रजि. बक्षीसपत्र दस्त क्रं. २५१४/२०२१ चे नोंदणीकृत बक्षीसपत्राद्वारे विनामोबदला बक्षीस म्हणून दिलेली मिळकत आहे.

**०६.** सदर मिळकत ग्रामपंचायत दप्तरी नोंद होणेकरीता दि. १५.०९.२०२१ रोजी अर्ज दाखल केला आहे. परंतु प्रतिवादी यांनी जाणीवपूर्वक राजकीय द्वेषापोटी अदयाप असेसमेंट सदरी वादींचे ट्रस्टचे नांव नोंद केलेले नाही. प्रतिवादी क्रं. १ यांना वादींचे विरुध्द मनात द्वेष आहे.

त्यामुळे प्रतिवादी क्रं. १ हे प्रतिवादी क्रं. २ ला हाताशी धरुन वादीना बेकायदेशीरपणे वेगवेगळ्याप्रकारे त्रास देत असतात. वादी यांनी गावठाण हद्दीतील दावा मिळकत ही गायरान हद्दीत असलेचा चुकीचा अर्थ काढून तसा बनाव करुन प्रतिवादी क्रं.१ हे प्रतिवादी क्रं. २ चे मदतीने वादीना दावा मिळकतीमधील वादींचे मालकी वहिवाटीची मिळकत उपभोगणेस मज्जाव करत आहेत. दि. ११.११.२०२२ रोजी वादी दावा मिळकतीमध्ये सुरु असलेल्या मंदिर इमारतीचे बांधकाम कामगारांकडून करुन घेत असताना प्रतिवादी क्रं. १ यांनी दावा मिळकतीमध्ये येऊन वादींना बेकायदेशीरपणे हरकत व अडथळा करुन दावा मिळकतीमधील बांधकाम काढून घ्या अन्यथा आमचे ताकदीचे जोरावर व अधिकराचा गैरवापर करुन तुमची राहती घर मिळकत पाडून टाकतो अशी धमकी दिली.

**०७.** दावा मिळकत ही एकमेव मालकीची मिळकत असून दावा मिळकतीमध्ये वादी यांचे ट्रस्ट मंदिराचे बांधकाम सुरु आहे. प्रतिवादी क्रं. १ गावचे सरपंच असलेने त्यांची आर्थीक परिस्थिती चांगली आहे व ते अंगबळाचे जोरावर व अधिकाराचा गैरवापर करुन वादीना दावा मिळकतीमधून हुसकावून लावून त्यांची इमारत बांधकाम बेकायदेशीरपणे पाडून टाकणेचा खटाटोप प्रतिवादींनी चालविला आहे. त्यामुळे प्रतिवादीचे गैर कृत्याना आळा

घालणेकरीता दावा मिळकतीमध्ये वादीचे कब्जे वहिवाटीला प्रतिवादीनी हकरत व अडथळा करु नये म्हणून सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे प्रतिवादी विरुध्द तुर्तातुर्त मनाई होणे आवश्यक आहे. प्रतिवादी विरुध्द मनाई ताकीद न झालेस वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे.

०८. प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी त्यांचे म्हणणे नि.क्रं.१८ वर दाखल केले आहे. पुढे त्यांनी असे कथन केले आहे की, वादी यांचा सदरचा अर्ज व कथने ही संपूर्ण चुकीची, खोटी व अधिकारबाहय, बेकायदेशीर असलेने तो प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाहीत.

०९. वादी अर्जात नमूद केलेली मिळकत ही कधीही किशोर गोपाळ बोरवणकर यांची वडिलोपार्जीत मालकी वहिवाटीची मिळकत नव्हती व नाही. याउलट सदर ग्रामपंचायत मिळकत नं. १४६ ही मिळकत गावठाणच्या हद्दीतील नसून महाराष्ट्र शासन व प्रतिवादी शासकीय संस्थेच्या आखत्यारितील गायरान हद्दीतील मिळकत आहे. त्यामुळे सदर मिळकतीशी वादीचा मालकी वहिवाटीशी वादी तसेच किशोर बोरवणकर यांचा काहीही संबंध येत नाही. वादी ज्या असेसमेंट कागदपत्राचे आधारे मालकी कब्जे वहिवाट सांगणेचा प्रयत्न करत आहेत तो फक्त कर आकरणी कागद असलेने त्याद्वारे कोणतीही मालकी हक्क व अधिकार प्राप्त होत नाही त्यामुळे वादी

यांचा मनाई अर्ज खर्चासह नामंजूर होणेस पात्र आहे.

**१०.** अर्जात नमूद केलेप्रमाणे ग्रामपंचायत मिळकत नं. १४६ व त्यास लागून असलेली पडसर जागा ही गायरानमध्ये येत असलेने आणि त्याची मालकी व सर्व हक्क, अधिकार शासन आणि प्रतिवादी संस्थेकडे आहेत. तसेच अर्जात नमूद केले प्रमाणे बक्षीसपत्र किंवा अन्य कोणत्याही प्रकारे तबदिल, हस्तांतर करणेचा कोणताही अधिकार किशोर, शोभा बोरवणकर यांना कायद्याने प्राप्त होत नाही. सदर इसमांनी तसे करुन शासनाची जमीन असेसमेंट सारखा कादरपत्राच्या आधारे व्यवहार करुन शासनाची परवानगी शिवाय त्यांची फसवणूक करुन गुन्हा करुन बेकायदेशीर दस्त केला आहे. कायद्यानुसार असेसमेंट उतारा हा मालकी हक्क दर्शवणारा कागद नसलेचे स्पष्ट असताना देखील त्याआधारे सदर तथाकथित, अधिकारबाहय, शासनाची फसवणूक करुन दिले असलेने त्याआधारे वादी यांना कोणताही मालकी हक्क प्राप्त झलेला नव्हता व नाही. त्यामुळे सदरचा अर्ज कायद्याने चालणेस पात्र नसलेने तो खर्चासह नामंजूर होणेस पात्र आहे.

**११.** सदरचे क्षेत्र हे अतिक्रमित असलेने अलीकडेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अंमलबजावणीचे कामी मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी स्वंप्रेरित दाखल करुन घेतले अवमान याचिकेमध्ये दिले आदेशा प्रमाणे

शासनाच्या आधीन राहून प्रतिवादीनी सदरचे अतिक्रमण निष्काशीत करणे संबंधाने मिळकत नं. १४६ तसेच अन्य अतिक्रमित मिळकती रितसर नोटीस बजावली असता सदरची बाब मे. कोर्टापासून लपवून ठेऊन वादी स्वतःचे बेकायदेशीर कृत्य झाकू पहात आहे. सदर नोटीसीस बगल देणेकरीता सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे वादी यांचा सदरचा अर्ज रक्कम रु. ५०,०००/– कॉस्ट बसवून नामंजूर करावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

**१२.** वादीच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादीचे कथन तसेच संचिकेत दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालील प्रश्नबिंदू विचारार्थ उपस्थित होतात. सदर प्रश्नबिंदूचे निष्कर्ष कारणमिमांसेह खालील प्रमाणे –

| **अ.क्र.** | **प्रश्नबिंदू** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीचे हक्कात प्रथमदर्शनी केस आहे काय ? | होकारार्थी |
| २. | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे ? | होकारार्थी |
| ३. | उक्त अर्ज नामंजूर केल्यास वादी चे अपरिमित नुकसान होईल ? | होकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशा प्रमाणे |

**१३.** वादीतर्फे दावा मिळकतींच्या संदर्भात नि.क्रं. ३ व २९ सोबत दाखल केलेले कागद खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | कागदाचा तपशील | दिनांक | दाखल कागद |
|---|---|---|---|
| १. | ग्रामपंचायत अंबर्डे यांचेकडी सन २०२१–२२ करीता मिळकत क्रं. १४६ चा असेसमेंट उतारा | १३.११.२०२२ | स.शि.नक्कल |
| २. | ग्रामपंचायत अंबर्डे यांचेकडी सन २०२०–२१ करीता मिळकत क्रं. १४६ चा असेसमेंट उतारा | २४.१२.२०२० | स.शि.नक्कल |
| ३. | ग्रामपंचायत अंबर्डे यांचेकडी सन २०१४–१८ करीता मिळकत क्रं. १४६ चा असेसमेंट उतारा | २१.०५.२०२२ | स.शि.नक्कल |
| ४. | ग्रामपंचायत अंबर्डे यांचेकडी सन २००८–१२ करीता मिळकत क्रं. १४६ चा असेसमेंट उतारा | २१.०५.२०२२ | स.शि.नक्कल |
| ५. | ग्रामपंचायत अंबर्डे यांचेकडी सन २००४–०८ करीता मिळकत क्रं. १४९ चा असेसमेंट उतारा | २१.०५.२०२२ | स.शि.नक्कल |
| ६. | ग्रामपंचायत अंबर्डे यांचेकडी सन २०००–०४ करीता मिळकत क्रं. १४६ चा असेसमेंट उतारा | १८.०५.२०२२ | स.शि.नक्कल |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | रजि. दस्त क्रं. २५१४/२०२१ चा इंडेक्स उतारा. | ०७.०९.२०२१ | झेरॉक्स |
| ८. | यातील वादी यांनी प्रतिवादीकडे असेसमेंट सदरी नोंद होणेकरीता केलेला अर्ज. | १५.०९.२०२१ | झेरॉक्स |
| ९. | वादी यांना दिलेल्या अधिकाराचा ठराव | १६.११.२०२२ | अस्सल |
| १०. | दावा मिळकतीचे फोटो एकूण–२ | १९.११.२०२२ | फोटो कॉपी |
| ११. | ग्रामपंचायत हरपवडे यांचेकडील मिळकत क्रं. २९९ चा १९८८ ते १९८९ चा असेसमेंट उतारा. | १५.०२.२०२३ | झेरॉक्स |
| १२. | ग्रामपंचायत हरपवडे यांचेकडील मिळकत क्रं. ३१ चा १९७७ ते १९८१ चा असेसमेंट उतारा. | १५.०२.२०२३ | झेरॉक्स |
| १३. | ग्रामपंचायत हरपवडे यांचेकडील मिळकत क्रं. ३१ चा १९७३ ते १९७७ चा असेसमेंट उतारा. | १५.०२.२०२३ | झेरॉक्स |
| १४. | ग्रामपंचायत हरपवडे यांचेकडील मिळकत क्रं. ३१ चा १९६९ ते १९७२ चा असेसमेंट उतारा. | १५.०२.२०२३ | झेरॉक्स |
| १५. | ग्रामपंचायत हरपवडे यांचेकडील मिळकत क्रं. ३१ चा १९६१ ते १९६२ चा असेसमेंट उतारा. | १५.०२.२०२३ | झेरॉक्स |

**१४.** प्रतिवादीतर्फे दावा मिळकतींच्या संदर्भात नि.क्रं. १७,२१ व २४ सोबत दाखल केलेले कागद खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | कागदाचा तपशील | दिनांक | दाखल कागद |
|---|---|---|---|
| १. | ग्रामपंचायत अंबर्डे तर्फे वकील नेमणुकीचा ठराव | २८.१२.२०२२ | झेरॉक्स |
| २. | ग्रामपंचायत अंबर्डे येथील विषय नं.५, ठराव क्रं. ४५ चा ग्रामपंचायत मिटींग ठराव. | ०६.०१.२०२३ | सत्यप्रत |
| ३. | भूमि अभिलख पन्हाळा यांचे करवी मौजे अंबर्डे, ता.पन्हाळा गट नं. ४७ गायरान यांचा मोजणी करुन हद्दी कायम कले बाबतचे पत्र | २७.०५.२०२२ | झेरॉक्स |

**१५.** वादी यांनी त्यांच्या कथना पृष्ठयर्थ मा. वरिष्ठ न्यायालयांचे खालील न्यायनिर्णय दाखल केले आहेत

1. **<u>High Court on its own motion Vs. The State of Maharashtra through its Rural Development Departmetn., Suo Motu Publick Interest Litigation No.2 of 2022.</u>**

सदर न्यायनिर्णयांचे अवलोकन करुन या अर्जाचे आदेशावेळी सदर न्यायनिर्णय विचारात घेतले आहेत.

१६. प्रतिवादी यांनी त्यांच्या कथना पृष्ठयर्थ मा. वरिष्ठ न्यायालयांचे खालील न्यायनिर्णय दाखल केले आहेत

1. **<u>High Court on its own motion Vs. The State of Maharashtra and Ors, Suo Motu Publick Interest Litigation No.2 of 2022.</u>**
2. **<u>Jagpal Sing & Ors. Vs. State of Punjab & Ors, Supreme Court of India Civl Appel No.1132/2011 dated 28th January, 2011.</u>**

सदर न्यायनिर्णयांचे अवलोकन करुन या अर्जाचे आदेशावेळी सदर न्यायनिर्णय विचारात घेतले आहेत.

१७. दोन्ही बाजुंच्या दस्तऐवजाचे अवलोकन करता वादी यांनी दाखल केलेली दस्तऐवज सोबत विश्लेषीत केलेली छायाचित्रे ही भारतीय पुरावा कायदया अंतर्गत तरतुदीनुसार पुराव्यादरम्यान सिध्द होतील तत्पुर्वी ती प्रस्तुत अर्जासाठी विचारात घेण्यात येत नाहीत.

## <u>का र ण मि मां सा</u>

### <u>प्रश्नबिंदू क्रं.१ करीता–</u>

१८. वादी हे तुर्त मनाई आदेश मिळविण्यासाठी प्रथमदर्शनी दावा मिळकती संदर्भाने त्यांचा हक्क शाबित करतात हे पाहाणे महत्वाचे आहे.

१९. वादी ही सहाय्यक धर्मादाय आयुक्त कोल्हापूर यांच्याकडे

नोंदणीकृत असलेली अंबर्डे गावची सार्वजनिक विश्वस्त संस्था आहे. वादीचे असे कथन आहे. दावा मिळकत ही, त्यांना मुळ मालक किशोर बोरवणकर व सौ.शोभा बोरवणकर यांच्याकडून दि. ०७.०९.२०२१ रोजी नोंदणीकृत बक्षीसपत्राने प्राप्त झालेली आहे. परंतु राजकीय वादापोटी असेसमेंट सदरी प्रतिवादीनी नोंद केलेली नाही. अशा परिस्थितीत वादीने दावा मिळकतीचे बक्षीस पत्राने मालक असल्याचे कथन करतात व त्याआधरे वहिवाट असल्याचे सांगतात.

२०. वादीने वहिवाट दर्शविण्यासाठी गाव नमुना ८–अ (नि.क्रं.३ व २९) चे विविध वर्षाचे उतारे जोडले आहे. त्यामध्ये वादी संस्थेला दावा मिळकत ही ज्या तथाकथित मालका कडून प्राप्त झाली त्यांच्या नावाची नोंद दिसते. तसेच त्यावर क्षेत्रफळ व बांधकाम नमूद आहे. घरफाळा भरल्याचे ही त्यावरून दिसून येते. तसेच वादी संस्थेने नमुना ८–अ वर त्यांच्या नावाची नोंद होण्याविषयी केलेला अर्ज प्रत देखील दाखल आहे.

२१. प्रतिवादीने त्याच्या नि.क्रं.१८ म्हणण्यामध्ये दावा मिळकत शासनाची आहे व वादी कथन करतात त्यानूसार किशोर बोरवणकर व शोभा बोरवणकर यांच्या मालकीचे नव्हते असे कथन करतात व केलेले बांधकाम अतिक्रमीत स्वरुपाचे असल्याचे सांगातात. ज्या बक्षीसपत्रावर वादीची भिस्त

आहे तो बनावट आहे असे देखील कथन करातात.

२२. वादीने नि.क्रं.३/७ वर बक्षीसपत्राचा इंडेक्स उतारा दाखल केला. त्याचे अवलोकन करता तो नोंदणीकृत दस्त असून वादी संस्थेस दि. ०७.०९.२०२१ रोजी बक्षीस पत्राने दावा मिळकत प्राप्त झाल्याचे दिसते. सदरचा दस्त बोगस आहे किंवा कसे हे पुरावाच्या वेळी समोर येईल. परंतू आजमितीस सदर दस्त आव्हानीत नाही अथवा रद्दबातल नाही. त्यामुळे तो अर्जासाठी ग्राहय आहे. आज रोजी वादीने सकृतदर्शनी वहिवाट व मालकी दर्शविणारा पुरवा प्रकरणात दाखल केला आहे. सबब, वादीने प्रथमदर्शनी दस्तावरुन दावा मिळकती संदर्भाने त्याचा हक्क सिध्द केला आहे. म्हणून प्रश्नबिंदू क्रं. १ चे उत्तर होकारार्थी देण्यात येते.

**प्रश्नबिंदू क्रमांक २ व ३ करीता** –

२३. वादीने दावा मिळकती संदर्भाने प्रथमदर्शनी त्याचा हक्क सिध्द केलेला आहे. अशा परिस्थितीत तो दाव्याच्या निकाल पावेतो संरक्षीत ठेवणे गरजेचे आहे. तसे न झाल्यास नुकसान हे वादी संस्थेचे होणार आहे. त्यामुळे न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे. सबब, प्रश्नबिंदू २ व ३ होकारार्थी नोंदविण्यात येतो.

**प्रश्नबिंदू ४ करीता –**

२४. प्रश्नबिंदू क्रं. १ ते ३ चे उत्तर हे वादीच्या हक्कात असल्याने प्रश्नबिंदू क्र. ४ चे निष्कर्षादाखल खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात आला आहे.

२. प्रतिवादी यांनी वादी यांचे दावा मिळकत मधील शांततामय कब्जे वहिवाटीस स्वतः अगर तर्फे इसम यांनी दाव्याच्या निकालापावेतो हरकत अगर अडथळा करुन नये अशी तुर्तातुर्त मनाई देण्यात येते.

२. उक्त अर्जाचा खर्च दाव्याच्या अंतिम निकालानंतर होणा–या खर्चाच्या आकारणीवेळी विचारात घेण्यात यावा.

Neha K.Nagargoje

Digitally signed by Neha K.Nagargoje
Date: 2023.03.23 17:42:03 +0530

(नेहा कों.नागरगोजे)
दि. २३.०३.२०२३. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कळे–खेरीवडे.